सत्यमेव जयते

# शुल्क नियामक प्राधिकरण

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियमन), अधिनियम, २०१५

"शिक्षण-नव्हे व्यवसाय-ज्ञान यज्ञ"

३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत,
४९, खेरवाडी, अली यावर जंग मार्ग,
वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१

ई-मेल: fra.govmh@gmail.com
संकेतस्थळ: www.mahafra.org
दूरध्वनी: ०२२-३१९८०३४८ / मोबाईल क्र.८८२८७८६२६४


## शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त

**दिनांक : २४ एप्रिल, २०२५**

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश आणि शुल्क नियमन) कायदा, २०१५ च्या कलम ११ (२)(३)(४) अंतर्गत स्थापन केलेल्या शुल्क नियमन प्राधिकरणाची बैठक दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी बैठक रुम क्र.३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९ खेरवाडी, अली यावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ येथे संपन्न झाली.

**खालील सदस्य उपस्थित/अनुपस्थित होते :**

| | | |
|---|---|---|
| १ | माननीय न्यायाधीश व्ही.एल.अचलिया (निवृत्त)<br>अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| २ | डॉ.विजय वसंत खोले<br>मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ३ | श्री.मनोज दामोदर चांडक<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ४ | श्री.नितीन बापुराव चव्हाण<br>सनदी लेखापाल<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | अनुपस्थित |
| ५ | श्री.रत्नाकर (शिरीष) फडतरे<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.अतुल दामोदर धारप<br>परिव्यय लेखापाल,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ७ | ॲड.श्री.धमेंद्र दिलीप मिश्रा<br>व्यावसायिक शिक्षणतज्ञ,<br>सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |
| ८ | संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | श्री.प्रमोद नाईक, सहसंचालक (तंत्रशिक्षणचे प्रतिनिधी)<br>उपस्थित |
| ९ | संचालक, उच्च शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.प्रकाश बच्चाव, सहसंचालक<br>उपस्थित (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) |
| १० | आयुक्त वैद्यकीय शिक्षण (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.सुनिल लिलानी<br>आयुक्तांचे प्रतिनिधी<br>उपस्थित |
| ११ | संचालक, आयुष (म.रा.)<br>पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.प्रशांत दळवी<br>(आर.ए.राठोड आयुर्वेद वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई)<br>उपस्थित |
| १२ | महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे आणि पदसिध्द सदस्य, शुल्क नियामक प्राधिकरण | डॉ.वाय.सी.साळे<br>उपस्थित (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे) |
| १३ | डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.<br>सदस्य सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण | उपस्थित |

**विषय क्र.१ दिनांक ०९ एप्रिल, २०२५ रोजी झालेल्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे इतिवृत्त मंजूर करणेबाबत**

चर्चा झाली.

दि.०९ एप्रिल, २०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करण्यात आले आणि मंजूर झाले.

**विषय क्र.२ जामखेड येथील रत्नदीप महाविद्यालय चालविणा-या बी.ए.एम.एस.अभ्यासक्रमाविरुध्द विद्यार्थ्यांकडून आलेल्या तक्रारींचा विचार करण्यासाठी**

आजच्या शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीच्या सुनावणीसाठी रत्नदीप महविद्यालयाचे प्राचार्य, श्री. भास्कर मोरे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे कर्मचारी, महाराष्ट्रातून वेगवेगळया ठिकाणाहून पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

महाविद्यालयाने एकूण ९४ विद्यार्थ्यांकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारले आहे :-

१. टयुशन फी

२. इतर फी

३. बस, मेस आणि हॉस्टेल - या प्रकारचे शुल्क घेतले.

बैठकीचे वेळी श्री.मोरे यांनी मुद्देनिहाय खुलासा सादर केला. यापूर्वीच्या बैठकीमध्ये सूचित केल्याप्रमाणे बीएएमएस च्या विद्यार्थ्यांकडून अदा फी सदराखाली गोळा केलेली लायब्ररी डिपॉझिट, लॅब डिपॉझिट, जिमखाना, शैक्षणिक सहल यासाठी गोळा केलेली फी विद्यार्थ्यांना परत करण्याचा विद्यार्थिनिहाय तक्ता सादर केला असून त्यानुसार रक्कम रु.८६,४१,२००/- अदा करणेस सहमती दर्शविली आहे. शुल्क नियामक प्राधिकरणाकडे जमा केलेल्या रकमेतून सदर रक्कम विद्यार्थ्यांना अदा करण्यात यावी.

एकूण ९४ विद्यार्थ्यांपैकी ६६ विद्यार्थ्यांचे शपथपत्र बरोबर असल्याचे व उर्वरित २८ विद्यार्थ्यांचे शपथपत्र चुकीचे असल्याचे श्री.मोरे यांनी प्राधिकरणाला सांगितले. महाविद्यालय हे विद्यार्थ्यांकडून शुल्काव्यतिरिक्त कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारु शकत नाही. महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांकडून पात्रता शुल्क आकारले आहे, त्याची पावती विद्यापीठाकडून घेणे आवश्यक आहे. महाविद्यालयाने प्रत्येक विद्यार्थ्याकडून रु.३०,०००/- गणवेश व अभ्याससाहित्याच्या नावाखाली घेतले आहेत. महाविद्यालयाने विद्यार्थ्यांना ॲपरॉन दिले नाहीत, विद्यार्थिनींना दिले आहेत. महाविद्यालयाने शुल्काव्यतिरिक्त इतर पैसे विद्यार्थ्यांकडून आकारले आहेत ते पैसे घेणे हे कायद्याने गुन्हा आहे. तसेच गणवेश व अभ्याससाहित्य याची किंमत काय आहे ते या कार्यालयास सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांकडून पात्रता शुल्क दोन वेळा आकारले असेल तर महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी (MUHS) बोलून ते शुल्क परत घेण्याच्या सूचना दिल्या. याशिवाय महाविद्यालयाने ज्या विद्यार्थ्यांकडून पात्रता शुल्क आकारले आहे ते वर्गनिहाय (class-wise) विद्यार्थ्यांना परत करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या.

महाविद्यालयाने प्रत्येक विद्यार्थ्याकडून खालीलप्रमाणे शुल्क आकारले आहे :

| | | |
|---|---|---|
| अ. | वाहतूक (बस) | रु. ३०,०००/- |
| ब. | वसतिगृह | रु. ६०,०००/- |
| क. | विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय (Mess) | रु. ६०,०००/- |

वर नमूद केलेले सर्व शुल्क (वाहतूक, वसतिगृह तसेच विद्यार्थ्यांच्या जेवणाची सोय) प्राधिकरणाने श्री.भास्कर मोरे यांना व्यवस्थितरित्या तपासून देण्यास सांगितले. वसतिगृहाची सुविधा विद्यार्थ्यांनी सात महिने उपभोगली असल्याचे श्री.मोरे यांचे म्हणणे आहे, तर ही सुविधा विद्यार्थ्यांनी फक्त तीन महिने उपभोगली आहे, असे पालकांचे म्हणणे आहे.

श्री.अतुल धारप (परिव्यय लेखापाल), सदस्य यांनी महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून जे वाहतुकीचे (बस) शुल्क आकारले आहे त्याचा सविस्तर तपशील (विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याच्या पहिल्या दिवसापासून ते शेवटच्या दिवसापर्यंत) तपासून घेण्यासाठी श्री.मोरे यांना सूचना दिल्या. तसेच श्री.धारप, सदस्य यांनी महाविद्यालयाचा लेखापरीक्षा अहवाल श्री.मोरे, प्राचार्य यांच्याकडे मागितला आहे. रत्नदीप महाविद्यालयाच्या वाहतूक सुविधा या ट्रस्टच्या असूनही ते पैसे महाविद्यालयाने विद्यार्थ्यांकडून आकारले असल्याचे काही विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. ज्या विद्यार्थ्यांनी प्रथम रत्नदीप महाविद्यालयात प्रवेश घेतला पण काही कालावधीनंतर ते महाविद्यालय बंद पडून ज्या विद्यार्थ्यांना दुस-या महाविद्यालयात प्रवेश घ्यावा लागला त्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली नसल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.

महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतेवेळी ज्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकडून जे शुल्क आकारले आहे त्या सर्व विद्यार्थ्यांना ते पैसे परत करावेत असे श्री.मोरे यांना निर्देश दिले. तसेच सुनावणीसाठी उपस्थित असलेल्या इतर सर्व विद्यार्थ्यांचे म्हणणे ऐकून घेतले व त्यांच्या तक्रारींची दखल घेतली.

उपस्थित असलेली महाविद्यालयाची विद्यार्थिनी कुमारी प्रणाली व्यवहारे हिला काही तक्रार असल्याचे विचारले असता तिने असेही सांगितले की, महाविद्यालयाने विद्यार्थ्यांवर बळजबरी करुन सहलीचे शुल्क (रु.७,२००/-) आकारले गेले आणि हे पैसे ज्या वर्गामध्ये सी सी टीव्ही फुटेज नाही त्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षकांनी बोलावून मागितले गेले. तसेच या महविद्यालयामध्ये प्रवेश घेतेवेळी रु.२,४७,०००/- शुल्क प्रत्येक विद्यार्थ्यांकडून आकारले गेले. त्याव्यतिरिक्त रु.१,२७,०००/- जादाचे पैसे भरण्यास विद्यार्थ्यांवर बळजबरी करण्यात आली. बी.ए.एम.एस.हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी तसेच ज्या विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था ज्या वसतिगृहामध्ये करण्यात आली होती, त्या विद्यार्थ्यांना कालांतराने एका मंगल कार्यालयामध्ये हलविण्यात आले.

१. रत्नदीप महाविद्यालयाच्या इतर विद्यार्थिनी / विद्यार्थी सुनावणीसाठी उपस्थित होते, त्यांची नावे खालीलप्रमाणे -

| | | |
|---|---|---|
| १ | कुमारी प्रणाली प्रशांत व्यवहारे | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| २ | कुमारी प्राची राजेश चौधरी | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| ३ | कुमार मंगेश मदन खोरगे | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| ४ | कुमार ज्ञानेश्वर रामेश्वर चोले | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| ५ | कुमार प्रमोद महादेव करांडे | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| ६ | कुमार अजय शाहुराव बडे | एस.एम.बी.टी. आयुर्वेद कॉलेज, नाशिक |
| ७ | कुमारी प्रज्ञा प्रदीप होळकर | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |
| ८ | कुमार शिवम महादू केंद्रे | एस.एम.बी.टी. आयुर्वेद कॉलेज, नाशिक |
| ९ | कुमार अभिषेक यादव | अंजनेया आयुर्वेद कॉलेज ॲन्ड हॉस्पिटल, नाशिक |

रत्नदीप महाविद्यालयात प्रवेश घेतेवेळी महाविद्यालयाने अनुसूचित जातीची विद्यार्थिनी (कुमारी प्रज्ञा प्रदीप होळकर) हिच्याकडून रु.२,२५,०००/- चा धनादेश व उर्वरित रक्कम रु.२२,५००/- रोख स्वरुपात घेतली. (एकूण रु.२,४७,५००/-)

बस, मेस व हॉस्टेलसाठी विद्यार्थ्यांनी जमा केलेली फीबाबत सविस्तर चर्चा झाली व सदर रक्कम विद्यार्थ्यांना परत करणेसाठी संस्थेने तातडीने रु.६५,००,०००/- इतकी रक्कम शुल्क नियामक प्राधिकरणाच्या खात्यात जमा करावी.

हॉस्टेल, बस व मेस यास्तव विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या रकमा तसेच टयुशन फी व डेव्हलमेंट फीबाबत पालक व संस्थाप्रमुख यांचे एकमत होत नसल्यामुळे शेवटी विद्यार्थि, पालक व संस्थाप्रमुख हे एकत्ररित्या बैठक घेऊन याबाबत निर्णय घेतील असे त्यांनी सांगितले.

**विषय क्र ३ : मा.कक्ष अधिकारी, उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य यांचे दि.०६.०३.२०२५ रोजीच्या पत्रामध्ये या विभागांतर्गत अभ्यासक्रमांकरिता येणा-या NRI व Management कोटयामध्ये प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांच्या शुल्काबाबत व दि.०९.०४.२०२५ रोजी झालेली बैठक**

मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दि.२५.०४.२०२५ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तामधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये झालेला निर्णय मा.कक्ष अधिकारी यांनी दि.०८.०३.२०२५ च्या ईमेलद्वारे प्राधिकरणाच्या कार्यालयात कळविले आहे. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने दि.०९.०४.२०२५ रोजी बैठकीत ठेवला. सदरील विषय पुढील बैठकीत ठेवण्याचा निर्णय होऊन तो आजच्या बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात आला. या बैठकीत खालील संबंधित संचालक /प्रतिनिधी उपस्थित होते :

१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय यांच्या वतीने श्री.प्रमोद नाईक, सहसंचालक, म.रा.तंत्रशिक्षण मंडळ तर्फे संचालक
२. डॉ.वाय.सी.साळे, कृषितज्ञ, महा.कृषि शिक्षण व संशोधन परिषद (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे)
३. डॉ.प्रकाश बच्चाव, सहसंचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे (व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे)

श्री.प्रमोद नाईक (सहसंचालक, तंत्र शिक्षण संचालनालय) यांनी सूचित केल्यानुसार तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणा-या संस्थांच्या अभ्यासक्रम प्रवेशासाठी अनिवासी भारतीय (NRI) व व्यवस्थापन (Management) २०% कोटा असतो. तो संस्थांच्या प्रवेश क्षमतेमध्ये समाविष्ट असतो. तसेच या विभागांतर्गत येणा-या संस्थांमध्ये Foreign National Quota हा १५% इतका प्रवेश क्षमतेच्या अधिक असतो. Foreign National Quota हा अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (AICTE) यांच्या निकषानुसार व मागणी केलेल्या संस्थेला त्यांची गुणवत्ता **तपासून मंजूर केला जातो व सदर कोटाचे प्रवेश जी संस्था करते** त्या प्रवेशासाठी कोणत्याही स्पर्धात्मक परीक्षेची (सीईटी/जेईई) आवश्यकता नसते.

तसेच डॉ.साळे, महाराष्ट्र कृषी शिक्षण आणि संशोधन परिषदेचे सदस्य सचिव, पुणे यांनी सांगितले की, कृषी अभ्यासक्रमासाठी २०% व्यवस्थापन (Management) कोटा आहे, परंतु NRI कोटा नाही.

डॉ.प्रकाश बच्चाव, सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी या विभागांतर्गत येणा-या व प्राधिकरण कक्षेत येणा-या अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटयाबाबत किती शुल्क आकारावे याबाबत सध्या माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. याबाबत सर्वश्री मा.संचालक यांचेशी संपर्क करुन लिखित स्वरुपात आपणास कळवितो असे सांगितले.

तथापि, प्राधिकरणाने यापूर्वी **दि.१९.०३.२०१८** रोजीच्या बैठकीत वैद्यकीय शिक्षण या विभागांतर्गत येणा-या पदवी (UG) अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन कोटासाठी तीन पट आणि पदव्युत्तर पदवी (PG) अभ्यासक्रमाच्या कोटासाठी चार पट कमाल मर्यादापर्यंत तसेच अनिवासी भारतीय कोटयासाठी वैद्यकीय अभ्यासक्रम (पदवी / पदव्युत्तर) पाच पट कमाल मर्यादा घेण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता.

त्या अनुषंगाने वरील मुद्दयाचे व प्रतिनिधीचे म्हणणे ऐकून प्राधिकरण खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे :

मा.मंत्री महोदय यांच्या दिनांक २५.०२.२०२५ च्या इतिवृत्तामध्ये दिलेल्या निर्देशानुसार प्राधिकरणाने सविस्तर चर्चा करुन वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या व्यवस्थापन / अनिवासी भारतीय कोटासाठी पूर्वी दि.१९.०३.२०१८ व तद्नंतर घेतलेल्या निर्णयाचा पुनर्विचार करुन यापुढे सरसकट शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ पासून वैद्यकीय शिक्षण विभाग / उच्च व तंत्र शिक्षण विभाग / कृषी विभाग / उच्च शिक्षण या विभागातील येणा-या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना **व्यवस्थापन कोटाकरीता तीन पट इतक्या कमाल मर्यादेपर्यंत शुल्क व अनिवासी भारतीय कोटाकरीता येणा-या सर्व पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी पाच पट इतक्या कमाल मर्यादेपर्यंत शुल्क लागू करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येत आहे.** तसेच अनिवासी भारतीय नसलेली / नसलेला (Against Non Resident Indian) जागेसाठी तीन पट कमाल मर्यादेपर्यंत शुल्क घेण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. संस्था या कमाल मर्यादेपेक्षा कमी शुल्क आकारणी करु शकतात.

सुलभ संदर्भासाठी तक्ता खालीलप्रमाणे :

| **व्यावसायिक शिक्षण अभ्यासक्रम** | **व्यवस्थापन कोटा (Management)** | **अनिवासी भारतीय (Non Resident Indian)** | **अनिवासी भारतीय व्यतिरिक्त (Against Non Resident Indian)** |
|---|---|---|---|
| पदवी अभ्यासक्रम (UG) | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **पाच पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत |
| पदव्युत्तर अभ्यासक्रम (PG) | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **पाच पट** कमाल मर्यादेपर्यंत | प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या शुल्काच्या **तीन पट** कमाल मर्यादेपर्यंत |

**विषय क्र.४ तक्रार निवारण उपसमितीच्या कार्यवृत्तांवर विचार करणे आणि निर्णय घेणे**

**१. मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट राजीव गांधी इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, अंधेरी (पश्चिम), मुंबई विरुध्द मुक्ता असोसिएशनची तक्रार**

चर्चा झाली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ चे कलम २ (ब) नुसार हितसंबंधित घटक याचा अर्थ व्यवस्थापन, संबंधित संस्थेत शिकणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक असा आहे. अधिनियमाचे कलम १३ (२) (तीन) नुसार हितसंबंधित घटकांच्या तक्रारीचे निवारण करण्याचे अधिकार शुल्क नियामक प्राधिकरणास आहेत.

डॉ.सुभाष आठवले, जनरल सेक्रेटरी, मुक्ता संघटना, तक्रारदार अधिनियमातील तरतुदीनुसार हितसंबंधित घटक नसल्याने सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**२. श्री.मिथुन गोपाल, गणराज्य, मुंबईचे अध्यक्ष यांनी वेलिंगकर इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट, माटुंगा, मुंबई यांच्याविरुध्द जास्त शुल्क वसूल केल्याबद्दल तक्रार केली**

चर्चा झाली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ चे कलम २ (ब) नुसार हितसंबंधित घटक याचा अर्थ व्यवस्थापन, संबंधित संस्थेत शिकणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक असा आहे. अधिनियमाचे कलम १३ (२) (तीन) नुसार हितसंबंधित घटकांच्या तक्रारीचे निवारण करण्याचे अधिकार शुल्क नियामक प्राधिकरणास आहेत.

तक्रारदार, श्री.मिथुन गोपाल, गणराज्य, मुंबई अध्यक्ष अधिनियमातील तरतुदीनुसार हितसंबंधित घटक नसल्याने सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**३. तक्रार क्रमांक ९५-९६-९७/२०२४ कुमार अनुप पासोलकर, कुमारी आकांक्षा पांडे, कुमारी अस्मा शेख यांची एजंल स्कूल ऑफ लॉ, नवी मुंबई विरुध्द तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार कुमार अनुप पासोलकर, कुमारी आकांक्षा पांडे, कुमारी अस्मा शेख यांच्याकडून महाविद्यालयाने वसूल केलेले जादा शुल्क महाविद्यालयाने संबंधितास परत केले असल्याने सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**४. तक्रार क्रमांक १२९/२०२४ अब्दुल रौफ मिर्झा, परभणी मेडिकल कॉलेजचा विद्यार्थी जास्त शुल्क मागत आहे आणि प्रवेश नाकारत असल्याची तक्रार**

चर्चा झाली.

प्रवेश प्रक्रियेसंदर्भात अडचणी आल्याने संबंधित विद्यार्थिनीचा प्रवेश होऊ शकला नाही. सदर तक्रार प्रवेश प्रक्रियेसंदर्भात असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात यावी.

५. **तक्रार क्रमांक ९८/२०२४ एनआरआय कोटयाअंतर्गत शुनिप्राने मंजूर केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क स्विकारल्याबद्दल नाशिकच्या डॉ.वसंतराव पवार मेडिकल महाविद्यालयाविरुध्द एम.डी. अभ्यासक्रमाचे माजी विद्यार्थी (शैक्षणिक वर्ष २०१७-१८) श्री.इम्रान पिंजारी आणि श्री.अक्षित गंगवाल यांची तक्रार**

चर्चा झाली.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क विनियमन) अधिनियम, २०१५ चे कलम २ (ब) नुसार हितसंबंधित घटक याचा अर्थ व्यवस्थापन, संबंधित संस्थेत शिकणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक असा आहे. हितसंबंधित घटकाच्या तक्रारीचे निवारण करण्याचे अधिकार शुल्क नियामक प्राधिकरणास आहेत.

डॉ.इम्रान पिंजारी आणि डॉ.अक्षित गंगवाल यांनी पी.जी.अभ्यासक्रमाकरीता शैक्षणिक वर्ष २०१७-२०१८ मध्ये प्रवेश घेतला होता. तक्रार करतेवेळी दोन्ही तक्रारदार माजी विद्यार्थी होते. तक्रारदार हितसंबंधित घटक नसल्याने सदर तक्रार बंद करण्यात येत आहे.

६. **आनंद अजित बापट, शहर कार्यकारिणी (पुणे विद्यापीठ विभाग), महाराष्ट्र नवनिर्माण सेना, पुणे यांच्याकडून डॉ.एन.वाय.तासगावकर इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्स, पुणे यांच्या विरोधात तक्रार**

चर्चा झाली.

सदर तक्रार प्रवेश प्रक्रियेशी संबंधित असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे पाठविण्यात यावी.

७. **तक्रार क्रमांक १२०/२०२४ महावीर एज्युकेशन सोसायटीच्या शाह ॲंड ॲंकर कच्छी अभियांत्रिकी महाविद्यालय, देवनार, मुंबई विरुध्द विकी व्ही वाघमारे, पालक यांच्याकडून प्राप्त झालेली तक्रार**

चर्चा झाली.

सदर तक्रार संबंधित संस्थेकडे/महाविद्यालयाकडे पाठविण्यात येऊन संबंधित कागदपत्रे/देयके यासह अनुपालन/स्पष्टीकरण मागविण्यात यावे.

८. **तक्रार क्रमांक १२६/२०२४ नवी मुंबईतील तेरणा मेडिकल कॉलेजने श्री.प्रसाद माशळकर यांना प्रवेश नाकारल्याबद्दल तक्रार**

चर्चा झाली.

सदर तक्रारदार यांच्या प्रवेश कोर्टामार्फत जादा पद निर्माण करुन झाला. तक्रारदार यांचा प्रवेश सहजतेने झाला नसल्याने व तक्रार प्रवेशासंबंधी असल्याने प्रवेश नियामक प्राधिकरण यांचेकडे पाठविण्यात यावी.

**९. तक्रार क्रमांक ३७/२०२४ माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक १८.१०.२०२४ रोजीच्या आदेशानुसार, रिट याचिका क्रमांक १०४६२ / २०२४, पायल कैलासराव तासकर विरुध्द डॉ.वसंतराव पवार मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल अॅन्ट रिसर्च सेंटर, नाशिक**

चर्चा झाली.

संस्था आणि तक्रारदार यांच्यामध्ये परस्पर समझोता झाला तसे समझोत्याचे पत्र शुल्क नियामक प्राधिकरणास सादर करण्यात आल्याने सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**१०. तक्रार क्रमांक ७९/२०२३ पालघर येथील सोनोपंत दांडेकर लॉ कॉलेजकडून तक्रारदार विद्यार्थ्यांना जास्तीचे शुल्क परत मिळणेबाबत**

चर्चा झाली.

सोनोपंत दांडेकर लॉ कॉलेजने शैक्षणिक वर्ष २०२०-२०२१ मधील विद्यार्थ्यांकडून वसूल केलेले जादा शुल्क परत केले आहे. तरी सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**११. ठाणे येथील अलामुरी रत्नमाला अभियांत्रिकी आणि तंत्रज्ञान संस्थेविरुध्द महाविद्यालयीन कर्मचा-याने भ्रष्टाचार केल्याची तक्रार**

चर्चा झाली.

सदर महाविद्यालयाच्या तक्रारींचे सचिव स्तरावर परिक्षण होऊन प्राधिकरणाकडे सादर करावे.

**१२. तक्रार क्रमांक १२४/२०२४ जोगेश्वरी येथील एच.के.कॉलेज ऑफ फार्मसीने अतिरिक्त शुल्क आकारल्याबद्दल शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील विद्यार्थ्यांची तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार यांनी संबंधित महाविद्यालयाने टयुशन फी व्यतिरिक्त रुपये २६,०००/- इतकी फी वसूल केल्याची तक्रार केली होती. सदर तक्रारीचे अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील सर्व विद्यार्थ्यांची इतर फी रुपये २६,०००/- महाविद्यालयाला परत केले असल्याने तक्रार बंद करण्यात यावी.

**१३. वैद्यकीय शिक्षण आणि आयुष विभाग यांचा संस्थात्मक कोटयातील प्रवेशांमध्ये अतिरिक्त विकास शुल्क आणि अनियमितता याबाबतचा दि.०३.१२.२०२४ रोजी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचेकडून प्राप्त झालेला तपासणी अहवाल**

चर्चा झाली.

वैद्यकीय शिक्षण व आयुष विभागाचा अहवाल पुढील बैठकीत चर्चेसाठी ठेवण्यात यावा.

**१४. तक्रार क्रमांक ११७/२०२४ डॉ.राजेंद्र गोडे मेडिकल कॉलेज, अमरावती यांच्याकडून हॉस्टेल मेस घेण्यास आणि त्यासाठी पैसे देण्यास दबाव आणल्याची शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मधील विद्यार्थ्याची तक्रार**

चर्चा झाली.

संबंधित संस्था/महाविद्यालय यांना सुनावणीसाठी बोलाविण्यात यावे.

**१५. तक्रार क्रमांक १३०/२०२४ करुणा सोनी यांची श्रीमती कमलाबेन गंभीरचंद लॉ कॉलेज, माटुंगा यांच्याविरोधात अतिरिक्त शुल्क आकारल्याबद्दल तक्रार**

चर्चा झाली.

संबंधित संस्था / महाविद्यालय यांना सुनावणीसाठी बोलाविण्यात यावे.

**१६. तक्रार क्रमांक ०१/२०२५ वेदांत इन्स्टिटयुट ऑफ मेडिकल सायन्सेस मध्ये प्रवेश नाकारल्याबद्दल डॉ. समृध्दी वाडफळे यांची तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार समृध्दी वाडफळे यांचा प्रवेश आहे तसा ईमेल संबंधित तक्रारदाराकडून प्राप्त झाला आहे. संबंधित महाविद्यालयात झालेली सदर तक्रार बंद करण्यात यावी.

**१७. तेरणा मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटल, वाशी आणि वेदांत मेडिकल कॉलेज, पालघर यांच्या विरोधात सीईटीकडून उत्तर**

चर्चा झाली.

अनुक्रमांक १३ चे नस्तीसोबत प्राधिकरणाकडे चर्चेसाठी ठेवण्यात यावी.

**१८. अल्पसंख्यांक विभागाकडून बेकायदेशीरपणे निधी घेतल्याबद्दल अकोला डॉ.जे.एम.जैसवाल होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज विरुध्द श्री.सैफुद्दीन अहमद यांची तक्रार**

चर्चा झाली.

सदर तक्रार या कार्यालयाचे अधिपत्याखालील नसल्याने वैद्यकीय शिक्षण व आयुष कार्यालय आणि सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडे पाठविण्यात आली आहे. प्राधिकरणाच्या कार्यवाहीची आवश्यकता राहिलेली नाही.

**१९. तक्रार क्रमांक १३१/२०२४ प्रवेशादरम्यान आकारण्यात येणा-या अतिरिक्त शुल्काबद्दल आणि शिष्यवृत्ती न मिळाल्याबद्दल परभणी वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे पालक श्री.संजय चोरमाळे यांची तक्रार**

चर्चा झाली.

शिष्यवृत्तीचे पैसे महाविद्यालयाने तक्रारदार यांचे खात्यात जमा केले आहेत. तसेच अतिरिक्त वसूल शुल्क महाविद्यालयाने तक्रारदार यांना परत केल्याचा ईमेल प्राप्त झाला आहे. त्यामुळे तक्रार बंद करण्यात यावी.

**२०. तक्रार क्रमांक १२७/२०२४ नंदनी पृथ्वीराज मौर्या, विद्यार्थिनी यांची डी.वाय.पाटील लॉ कॉलेजने अतिरिक्त शुल्क आकारल्याबद्दल तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार नंदिनी मौर्या यांनी महाविद्यालयाने अतिरिक्त वसूल केलेले शुल्क परत केले असून कॉलेजबद्दल तक्रार नसल्याचे ईमेलद्वारे कळविले आहे.

**२१. तक्रार क्रमांक १२२/२०२४ आर्यन पटियाने यांची एस.एस.पी.एम.मेडिकल कॉलेज, सिंधुदुर्ग विरुध्द प्रवेश नाकारल्याबद्दल तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार आर्यन पटियाने प्रवेश नियमित शुल्क अदा करुन संबंधित महाविद्यालयात झाल्याचे ईमेलद्वारे कळविले आहे. सदर तक्रारीचे निराकरण झाल्याने तक्रार दप्तरी दाखल करावी.

**२२. तक्रार क्रमांक १२३/२०२४ धुळे येथील ए.सी.पी.एम.मेडिकल कॉलेजने आयक्यू कोटयासाठी पाच पट शुल्क मागितल्याबद्दल श्री.प्रविण पिंपरकर यांची तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार श्री.प्रविण पिंपरकर यांच्या पाल्याचा प्रवेश संबंधित महाविद्यालयात झालेला असून महाविद्यालयाने अतिरिक्त शुल्क आकारलेली नाही असा ईमेल तक्रारदार यांचा प्राप्त झाला आहे.

तक्रारीचे निराकरण झाल्यामुळे तक्रार बंद करण्यात यावी.

**२३. तक्रार क्रमांक १२८/२०२४ सिंधुदुर्ग येथील एस.एस.पी.एम.मेडिकल कॉलेजने अतिरिक्त शुल्क आकारल्याबद्दल आर्य तरार यांची तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार आर्या तरार यांचा प्रवेश नियमित फी देऊन संबंधित महाविद्यालयात झाल्याचा ईमेल प्राप्त झाला आहे. तक्रारीचे निराकरण झाल्याने तक्रार दप्तरी दाखल करावी.

**२४. तक्रार क्रमांक १२५/२०२४ ए.एस.पी.एम.च्या आयुर्वेदिक कॉलेज हॉस्पिटल रिसर्च सेंटर इन्स्टिटयुट, बुलढाणा येथे आयक्यू कोटयासाठी पाच पट शुल्क मागितल्याबद्दल नमिरा फिरदोस वकार अहमद यांची तक्रार**

चर्चा झाली.

तक्रारदार नमिरा फिरदोर वकार अहमद यांच्या प्रवेश संबंधित महाविद्यालयात झाला आहे. संबंधित संस्थेने अतिरिक्त शुल्क आकारलेले नाही असा ईमेल तक्रारदार यांचा प्राप्त झाला आहे. तक्रारीचे निराकरण झाल्याने तक्रार दप्तरी दाखल करावी.

**२५. तक्रार क्रमांक १२१/२०२४ धुळे येथील ए.सी.पी.एम.मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलने संस्थात्मक/व्यवस्थापन कोटयापेक्षा पाच पट शुल्क मागितल्याबद्दल अमेय देवल यांची तक्रार**

चर्चा झाली.

विद्यार्थ्याचे पालक श्री.संजय देवल यांनी त्यांच्या पाल्याचा प्रवेश तीन पट फी देऊन झाला असल्याचे ईमेलद्वारे कळविले आहे. परंतु कॉलेजने पाच बेअरर चेक घेतल्याचेही तक्रारदाराने कळविले आहे. तरी संबंधितांस सुनावणीसाठी बोलवावे असे निर्देश देण्यात आले.

**२६. तक्रार क्रमांक ९/२०२५ औरंगाबाद येथील श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲंड टेक्नॉलॉनी विरुध्द राम वाखुरे यांची अतिरिक्त शुल्क मागितल्याबद्दल तक्रार (शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४)**

चर्चा झाली.

संबंधित विद्यार्थ्याकडून शुनिप्राने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा जास्त शुल्क संस्थेने वसूल केलेले नाही. काही विद्यार्थ्यांच्या आर्थिक परिस्थितीचे अवलोकन करुन महाविद्यालय शुनिप्राने निश्चित केलेल्या शुल्कापेक्षा कमी शुल्क आकारते असे समाधानकारक अनुपालन संस्थेने सादर केल्याने सदर तक्रारीवर कार्यवाही राहिलेली नाही. तक्रार बंद करावी.

२७. **तक्रार क्रमांक १८/२०२५ पगारातील तफावत आणि थकबाकीबाबत बीकेएल वालावलकर ग्रामीण वैद्यकीय महाविद्यालय, रत्नागिरी विरुध्द कनिष्ठ रहिवाशी डॉक्टरांची तक्रार**

चर्चा झाली.

कमी स्टायपेंड देण्याबाबतची तक्रार असून संस्थेने जास्त शुल्क वसूल केल्याबद्दलची तक्रार नसल्याने तक्रार दप्तरी दाखल करावी. तक्रारदाराला महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाशी संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात यावेत.

Adv.Shri Dharmendra Mishra, Hon'ble Member suggested as under :

The then Hon'ble Member Secretary, Fee Regulating Authority resolved in Authority minutes dated 15.01.2025 that "Stakeholders have got right to get their grievance redressed and the Authority shall take appropriate actions on non-stakeholders complaint with evidences".

In view of the above decision, it is recommended that the said policy be applied uniformly in all similar matters. The Authority should ensure that complains from non-stakeholders, when submitted with supporting evidence, are duly considered and dealt with in accordance with the prescribed procedures. This approach will promote consistency, fairness and transparency in the handling of such representations.

विषय क्र.५ **मा.अध्यक्ष, शुल्क नियामक प्राधिकरण, म.रा.यांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.**

निरंक

दिनांक : २४ एप्रिल, २०२५
ठिकाण : मुंबई

(डॉ.अर्जुन चिखले, भा.प्र.से.)
सदस्य सचिव
शुल्क नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य